# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील चरित्रात्मक कादंबरीतील शैक्षणिक कार्य आणि वेगळेपण

**मनिषा शंकर घोलप**

*बालाजी पार्क, कोल्हापूर*

**डॉ. सुनील चंदनशिवे**

*प्रमुख, मराठी विभाग,*

*सौ. मंगलताई रा. जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज*

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाच्या परिवर्तनाची गरज ओळखून शिक्षणाला प्रथम प्राधान्य दिले. विद्या आणि शिक्षण यामुळेच अस्पृश्यांचे जीवनमान व राहणीमान यात बदल होतील अशी खात्री डॉ. आंबेडकरांना होती. म्हणूनच सामाजिक दर्जा वाढविण्यासाठी शिक्षण हाच एकमेव उपाय असल्याचे त्यांनी जाणले होते. अस्पृश्य समाजाने शिक्षण घ्यावे यासाठी डॉ. आंबेडकरांनी शक्य तितके प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभे'ची स्थापना केली. या माध्यमातून त्यांनी समाजहितासाठी आवश्यक ती सर्व कार्ये केली.

सिद्धार्थ महाविद्यालय

सिद्धार्थ महाविद्यालयाच्या स्थापनेबाबत डॉ. दा. स. गजघाटे 'चंदनाला पुसा' या चरित्रात्मक कादंबरीत लिहितात, 'राजकारणाच्या धकाधकीतही बाबासाहेबांचे लेखन कार्य सुरू होते. अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून मुंबईत एखादे महाविद्यालय स्थापन करावे अशी तळमळ त्यांना १९४१ पासूनच लागून राहिली होती. त्यादृष्टीने ते अनेक बाजूने विचार करत होते. दौरे, गाठीभेटी, चर्चा यांच्या घाईगर्दीतही आपले ते स्वप्न साकार करण्याची धडपड त्यांनी सुरू ठेवली होती. 'पिपल एज्युकेशन सोसायटी' नावाची शिक्षणसंस्था स्थापन करून २० जून १९४६ रोजी त्यांनी 'सिद्धार्थ महाविद्यालय' सुरू केले.

लेखक दा. स. गजघाटे यांच्या चरित्रात्मक कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या कादंबरीची भाषा साधी, सोपी आहे. याबरोबरच ही कादंबरी लिहिताना धनंजय कीर यांच्या चरित्रग्रंथाचा आधार घेतल्याने सिद्धार्थ महाविद्यालयाच्या स्थापनेविषयीचे विवेचन म्हणजे कीर यांच्या चरित्रातील माहितीची पुनरावृत्तीच झाल्याचे जाणवते. हेच दा. स. गजघाटे यांच्या कादंबरीचे लेखनदृष्ट्या वेगळेपण जाणवते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्रात्मक कादंबरीतील शैक्षणिक कार्य:

चरित्राप्रमाणे चरित्रात्मक कादंबरीतही डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा त्या त्या लेखकांनी घेतल्याचे आढळते. लेखक हरिभाऊ पगारे यांनी ‘युगप्रवर्तक’ या कादंबरीतून डॉ. आंबेडकरांच्या निवेदनातून शैक्षणिक कार्याचे वर्णन केले आहे. यातून विस्तृत माहिती न देता अस्पृश्य विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घ्यावे यासाठी भारत सरकारकडून शिष्यवृत्ती मिळण्यासाठी उपाययोजना केली. त्याबरोबरच प्रत्येक विद्यार्थी सुसंस्कृत नागरिक बनावा यासाठी त्यांनी मुंबई-औरंगाबाद या ठिकाणी कॉलेज सुरू केल्याने शिक्षणापासून हजारो वर्षे वंचित असलेल्या अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली. लेखक हरिभाऊ पगारे यांनी आपल्या कादंबरीतून डॉ. आंबेडकरांच्या जीवनातील ठळक बाबींचाच आढावा घेतल्याचे दिसून येते. तर ‘युगंधर’ या कादंबरीत लेखक बा. स. हाटे यांनी ‘डॉ. आंबेडकरांनी पिपल्स एज्युकेशन सोसायटीची मुंबईत स्थापना केली.ङ्घ’[१] इतपतच वर्णन करून शैक्षणिक कार्याचा आढावा नामोल्लेखानेच घेतल्याचे आढळते.

लेखक दा. स. गजहाटे यांनी ‘चंदनाला पुसा’ या चरित्रात्मक कादंबरीतून डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा इतर कादंबरीकारांच्या तुलनेत विस्तृतपणे घेतल्याचे आढळते. त्यांनी पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या वतीने मुंबई येथे १९४६ साली ‘सिद्धार्थ महाविद्यालया’ची स्थापना केली. त्यानंतर त्यांनी शैक्षणिक कार्याच्या प्रसाराचा वेग वाढवला कारण शिक्षण हाच समाजोद्धाराचा एकमेव मार्ग असल्याचे त्यांनी जाणले होते. म्हणूनच पुढच्या शैक्षणिक कार्यासाठी डॉ. आंबेडकरांनी हैदराबाद संस्थानाची निवड करून अजिंठा लेण्यांच्या परिसरात पी.इ.एस. नावाचे महाविद्यालय दि. १९ जून १९५० रोजी सुरू केले व इमारतीच्या कोनशिलेचा समारंभ १ सप्टेंबर १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते झाला. हे महाविद्यालय सुरू केल्याने मराठवाड्यासारख्या मागासलेल्या भागात शैक्षणिक कार्यास चालना मिळाल्याचे दिसून येते. डॉ. आंबेडकरांचा पिंडच मुळात अभ्यासू असल्याने जीवनाच्या सायंकाळी औरंगाबादला राहावे व आपला सारा वेळ अभ्यास चिंतन, मननात व्यतीत करावा अशी त्यांची प्रबळ इच्छा होती. त्यांचा महाविद्यालय स्थापनाचा हेतू म्हणजे अस्पृश्य विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन समाजोद्धारार्थ कार्य करावे हाच होता. या महाविद्यालयाच्या ध्येयधोरणाचा परिचय करून देताना डॉ. आंबेडकर म्हणतात, ‘साधारणपणे देशभर व मुख्यत्वेकरून मागासलेल्या वर्गात उच्च शिक्षणाचा प्रसार करणे हे या संस्थेचे ध्येय व उद्दिष्ट आहे. नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे या कॉलेजमध्ये मुलांच्याबरोबरच मुलीही शिक्षण घेत आहेत. सामाजिक मागासलेपणा व सहशिक्षणाचा

गंधही नसलेल्या भागात मुलांच्या बरोबरीने मुलींनाही शिक्षण घेऊन कॉलेज एक नवीनच पायंडे पाडत आहे. या कॉलेजमध्ये सर्व जातींच्या व धर्माच्या मुली शिक्षण घेत आहेत. मुलींना शिक्षणाला उत्तेजन मिळावे व मोठ्या संख्येने त्यांनी कॉलेजमध्ये यावे म्हणून शहरापासून कॉलेजपर्यंत येण्याकरिता कॉलेजने एक बसही ठेवली आहे. या कॉलेजचे द्वार सर्वधर्मीयांना मोकळे आहे. येथे कुठल्याही प्रकारची जातीयता नाही. कॉलेजच्या प्राध्यापक वर्गात सर्व धर्माचे आणि जातीचे प्राध्यापक आहेत. विद्यार्थ्यांत विद्या, विनय व शील बाणवणे हे कॉलेजचे ध्येय आहे.ङ्क[२] डॉ. आंबेडकरांना बालवयापासून ते उच्च शिक्षण घेतल्यावर नोकरीत रुजू झाल्यानंतरही बडोदा येथे त्यांना अस्पृश्यतेची झळ सोसावी लागली होती. आपल्याबाबत जे घडले ते इतर विद्यार्थ्यांबाबत घडू नये या हेतूने त्यांनी सर्व जाती धर्माच्या मुला-मुलींना व प्राध्यापक वर्गाला मुक्त प्रवेश देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. याबरोबरच मुलांबरोबरच मुलींनाही प्रवेश देऊन स्त्री शिक्षणाला स्वातंत्र्यच त्यांनी घोषित करून समाजहिताच्या दृष्टीने मुलींच्या शिक्षणालाही महत्त्व दिल्याचे त्यांच्या वक्तव्यातून जाणवते.

पी.इ.एस. महाविद्यालयाच्या कोनशिला समारंभात डॉ. राजेंद्रप्रसाद डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक करताना म्हणतात, ‘डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी मी काही वेगळेपणाने सांगायला पाहिजे असे नाही. डॉ. आंबेडकर भारतातील एक प्रकांड पंडित आहेत. मोठमोठ्यांना पुरून उरेल एवढी विद्वत्ता त्यांच्याजवळ आहे. दीनदलितांविषयी त्यांच्या मनात प्रचंड कळवळा आहे. त्यांच्यात शिक्षणाचा फैलाव करण्यासाठी त्यांनी जी कळवळ व तळमळ दाखविली त्याचे मी कौतुक करतो व त्यांच्या शैक्षणिक कार्याला शुभेच्छा देतो.’[३] डॉ. आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व अभ्यासू असल्यामुळे शिक्षणाविषयी त्यांचा प्रचंड ओढा विशेषकरून महाविद्यालयीन शिक्षणाकडे होता. समाजहित साधायचे असेल तर शिक्षण हाच एकमेव उपाय असल्याचे त्यांनी जाणले होते. यासाठी त्यांनी अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रेरित केले यातूनच अनेक शाळा, महाविद्यालये, वसतीगृहे यांची स्थापना करून त्यांच्यापर्यंत शिक्षणप्रसार पोहोचविला. यातून आंबेडकरांची आपल्या समाजाविषयीची आत्मीयता व कळकळ दिसून येते.

लेखक दा. स. गजघाटे यांनी ‘चंदनाला पुसा’ या कादंबरीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक कार्याची विस्तृत माहिती देऊन त्यांच्या कार्याला कादंबरीत महत्त्वाचे स्थान दिले आहे. इतर कादंबरीकारांच्या तुलनेत दा. स. गजघाटे यांनी आपल्या लेखनशैलीतून डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचे दर्शन घडवून

कादंबरीतील वेगळापणा जपला आहे. त्याबरोबरच डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या कॉलेजची वैशिष्ट्येही कादंबरीत नमूद करून बाबासाहेबांच्या कार्यातील बारकावे टिपून कादंबरीचा आलेख उंचावला आहे. हेच करत असताना त्यांनी धनंजय कीर व चांगदेव खैरमोडे यांच्या चरित्रग्रंथाचा आधार घेतल्याचे दिसून येते. त्यातून त्यांच्या अभ्यासू वृत्तीचे दर्शनही घडते. कादंबरीतील ठळक घटना, प्रसंग आणि त्याची कल्पकतेने केलेली मांडणी ही त्यांच्या लेखनगर्भतेच्या वेगळेपणाची साक्ष देतात. बा. स. हाटे, हरिभाऊ पगारे, दा. स. गजघाटे या चरित्रात्मक कादंबरीकारांच्या तुलनेत अनंत ओगले (ध्रुवाचा तारा), भा. द. खेर (प्रबुद्ध), नाना ढाकूलकर (भिमाई-रमाई) या कादंबऱ्यांमधून डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतल्याचे आढळून येत नाही. काही कादंबरीकारांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनातील ठळक घटनांनाच प्राधान्य देऊन कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

### संदर्भ ग्रंथ

१) हाटे बा. स.- 'युगंधर' संबोधि प्रकाशन पुणे प्र. आ. ६ डिसेंबर १९८८ पृ. २२७.

२) गजघाटे दा. स.- 'चंदनाला पुसा' ऋचा प्रकाशन नागपूर प्र. आ. १८/०७/२००५ पृ. ४५२.

३) गजघाटे दा. स.- 'तत्रैव' पृ. ४५२.